**फौजदारी अर्ज (डी.व्ही.) क्र.११४/२०२२.**

**निशाणी क्रमांक ४ वर आदेश.**

कौटुंबीक हिंसाचार झाला करीता स्वत: व्यथित स्त्री आहे तसेच स्वत:चे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे असे कथन करत अर्जदार यांनी कौटुंबीक हिंसाचारा पासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज दाखल करत विविध अनुतोष जसे की, घरभाडे, आर्थीक मदत, खावटी, नुकसानभरपाई यांची मागणी केली. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करत अंतरिम पोटगीची मागणी.

**(२)** मुळ अर्ज, अंतरिम पोटगी मागणीचा अर्ज त्यावर सा.वाला यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे यासह संचिकेवर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले.

**मान्य व कबुल बाबी :—**

**(i)** नातेसंबंध **(ii)** अर्जदार क्र.१ व उत्तरवादी यांच्या विवाहसंबंधातुन त्यांना एक मुलगा व एक मुलगी जन्मली. मुलगा अमेय हा वडीलांकडे राहत आहे तर मुलगी/अर्जदार क्र.२ अर्पिता आईकडे राहत आहे. **(iii)** अर्जदार क्र.२ अर्पिता सज्ञान आहे. **(iv)** उत्तरवादी हे नगरपालिका शाळेमध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत.

**(३)** पत्नी असो अथवा अपत्य भले ते औरस असो की, अनौरस असो, निर्वाहा करीता आदेश पारीत करण्यापुर्वी हे पाहणे जरुरी की, ते स्वत:चे पालनपोषन करण्यास असमर्थ आहेत काय, त्यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे काय, उत्तरवादी यांच्याकडे त्यांना स्वतंत्र खावटी देण्यासाठी उत्पन्नाचे पुरेशे साधन आहे. मुळात उत्तरवादी यांच्याकडे पुरेशी आर्थिक ऐपत या एकाच बाबीचा विचार करता अंतरीम पोटगीचा आदेश पारीत करता येणार नाही. तशी ऐपत असताना देखील त्याने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व स्वत:चा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या कुटूंबीयांचा सांभाळ करण्यास उपेक्षा केली/तसे करण्यास नकार दिला असा अर्जदाराच्या वतीने युक्तीवाद. प्रस्तुतचे प्रकरण हे फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे दाखल प्रकरण नाही. कौ.हिं.म.रक्षण करणारा अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये आदेश नोंदवितेळी 'कौटुंबीक हिंसाचार' झाला काय या बाबी पहाणे

जरूरी. ना.उच्च न्यायालयाने दि.१६.०३.२३ रोजी **फौ.री.अर्ज क्र.२३३/१८** मध्ये असे ठरविले आहे की 'कौटुंबीक हिंसाचार' ही बाब 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' यापेक्षा भिन्न आहे.कौ.हिं.म.र.करणारा अधिनियमामध्ये 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' याचा उहापोह नाही. अधिनियमाध्ये 'कौटुंबीक हिंसाचार' ही व्याख्या सुस्पष्ठ नमुद आहे. त्याचा थेट संबध फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे दाखल प्रकरणा मधील 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' याच्याशी जोडता येणार नाही. त्यामुळे 'सांभाळ करण्यास उपेक्षा/नकार' यावरून खावटी देणे हे अधिकारक्षेत्राबाहेरील बाब आहे.

**(४)** त्यामुळे सांभाळ करण्यास नकार दिला/उपेक्षा केली केवळ इतक्याच बाबीवर उहापोह न करता मी संचिकेवरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन करत कौटुंबीक हिंसाचार झाला काय ही बाब पहात आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ व उत्तरवादी यांच्यामधील पती पत्नी हे नाते कायम आहेत. त्या विवाहसंबधातुन दोन मुले जन्मले. चारित्रयावर संशय घेणे, अपमानास्पद वागणूक देणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे मध्यरात्री घरातुन हाकलुन देणे, अर्जदार क्र.१ यांच्या आईवडीलांस अपशब्द वापरणे, गरोदर असताना अर्जदार क्र.१ यांची काळजी न घेणे व बाहेरख्याली वागणे असे थेट आरोप अर्जदारांनी उत्तरवादी यांच्याविरुध्द केले आहेत. अर्जदार क्र.२ या मुलीसह अर्जदार क्र.१ यांना घराबाहेर हाकलुन दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. कलम ३ मध्ये दिलेली कौटुबींक हिंसाचाराची व्याख्या वाचली. ज्यावरून हे स्पष्ठ होत आहे की, उपलब्ध्द पुराव्यावरून कौटुबींक हिंसाचार झाल्याचे स्पष्ठ दिसून येत आहे. केवळ शारीरीक पीडा नाही तर मानसीक त्रास हा देखील त्या व्याख्येमध्ये समाविष्ठ आहे.

**(५)** या प्रकरणामध्ये अर्जदार क्र.२ सज्ञान आहे. ती शारिरीक किंवा मानसिक अपसामान्यतेमुळे किंवा क्षतीमुळे स्वत:चा निर्वाह करण्यास असमर्थ असे अर्जदारांचेच कथन नाही. मुळात प्रस्तुतचे प्रकरण हे फौ.प्र.सं.कलम १२५ अथवा द हिंदू ॲडॉप्शन ॲन्ड मेंटेनन्स ॲक्ट, १९५६ मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरण नाही. त्यामुळे कौ.हिं.म.रक्षण करणारा अधिनियममधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये सज्ञान मुलीला अंतरिम पोटगीचा अनुतोष देता येईल काय असा प्रश्न उपस्थित झाला. अर्जदाराच्या वतीने त्यांची भिस्त **मेंटी त्रिनधा व्यंकट रामण्णा वि.मेंटी लक्ष्मी, २०२१ एस.सी.सी. ऑनलाईन ए.पी.२८७** या या न्यायनिर्णयावर ठेवली. त्या प्रकरणामध्ये दि.०९.०९.

२०२१ रोजी ना.आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने असे ठरविले की, Conjoint reading of Sec.2(a) and 2(f) of the DV Act would show that a daughter, who is or was living with her father in a domestic relationship by way of consanguinity, is entitled to seek reliefs including monetary relief on her own right as an aggrieved person U/Sec.2(a) of the DV Act irrespective of the fact whether she is a major or minor.

**(६)** ना.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ गोवा यांनी **अॅन्टेनीओ डी माटोस सीक्वेरीया अलमेडीया वि.फेलीसीडाडे विल्मा अलमेडीया, फौ.याचीका क्र.२३/२०१८** या प्रकरणामध्ये दि.०४/०६/१४ रोजी न्यायनिर्णय नोंदविला आहे. ज्या प्रकरणामध्ये अभियंता असलेल्या सज्ञान मुलास न्यायदंडाधिकारी यांनी खावटी मंजुर केली होती. त्या आदेशावर नाराज होत मा.सत्र न्यायालयामध्ये अपिल दाखल केले होते ज्यामध्ये मा.सत्र न्यायालयाने असे ठरविले की मुलगा हा जरी सज्ञान असला तरी त्याच्याकडे उत्पन्नाचे काहीही साधन नाही त्यामुळे दाखल अपिल नामंजुर केले होते. त्या आदेशावर नाराज होत प्रस्तुतची फौ.याचीका दाखल केली होते. त्या प्रकरणामध्ये ना. उच्च न्यायालयासमोर असा प्रश्न उपस्थीत झाला होता की कौ.हिं.म.र.करणारा अधि नियम, २००५ मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये सज्ञान मुलांस खावटी मंजुर करता येईल काय.? ना.उच्च न्यायालयाने असे ठरविले की, Sec.20 of the Act provides for a monetary relief to meet the expenses incurred and losses suffered by the aggrieved person and any child of the aggrieved person as a result of the domestic violence. As noticed earlier, a “child” within the meaning of sec.2(b) of the Act means any person below the age of 18 years. It is apparent from the record that the second respondent has attained majority and thus cannot be said to be a “child” within the meaning of sec.2(b) of the Act. ना उच्च न्यायालयाने असे मत नोंदविते वेळी **राजेंद्र डी सेठ वि.रेखा झा उर्फ रेखा आर सेठ, २०१६ ऑल. एम.आर.फौ.१५०६** या प्रकरणामधील न्यायानिर्णयावर भिस्त ठेवली होती.

**(७)** मुळात या प्रकरणामध्ये अर्जदार क्र.२ ही अविवाहीत आहे. **शौकत अजीज झारदार वि.नबील शौकत** या प्रकरणामध्ये ना.जम्मु व काश्मीर उच्च न्यायालयाने देखील सज्ञान मुलगा/मुलगी हे खावटी मिळण्यास अपात्र असे मत नोंदविले आहे. (अर्थात ते प्रकरण फौ.प्र.सं.कलम १२५ संदर्भात होते.) ना.केरळ उच्च न्यायालयाने दि. २५/०१/२३ रोजी असे ठरविले आहे की अविवाहीत सज्ञान मुलगी खावटी मिळण्यास पात्र नाही.

**(८)** **जयवर्धन सींह चापोटकाट वि.अजयवीर चापोटकाट** या प्रकरणामध्ये ना.उच्च न्यायालयाने दि.०८/०४/२०१४ रोजी असे ठरविले की शिक्षीत मुलगा हा आर्थीक दृष्टया सधन आई किंवा वडीलांकडून त्याच्या शैक्षणीक खर्चाकरीता रक्कम मागु शकतो भले तो सज्ञान असला तरी. तथापि, सदरचे प्रकरण हे कौ.हिं.म.रक्षण करणारा अधिनियम, २००५ अथवा फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे दाखल प्रकरण नव्हते. सदर प्रकरण हे द हिंदु ॲडॉप्शन ॲन्ड मेन्टेनन्स ॲक्ट १९५६ मधील कलम २० प्रमाणे दाखल प्रकरण होते.

**(९)** न्यायालयाचे काम निकाल देणे नाही तर न्याय करणे असे आहे. उत्तरवादी हे अर्जदारा सोबतच्या नातेसंबंध नाकारत नाहीत, त्यांची आर्थीक ऐपत देखील चांगली असल्याचे दिसून येते आहे तथापि, केवळ त्या एका बाबीवरून सज्ञान मुलीस कौ.हिं. म.र.करणारा अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार दाखल प्रकरणामध्ये अंतरिम पोटगी देता येणार नाही. या न्यायालयास ही देखील जाणीव आहे की १८ वर्ष पुर्ण झाले म्हणजे मुलगा/मुलगी हे शिक्षण पुर्ण करत, अर्थार्जन करण्यास स्वावलंबी झाले असे म्हणता येणार नाही. सध्य स्थितीमध्ये तर १८ व्या वर्षी १२ इयत्ता इतकेच शिक्षण होवू शकते. खरे शिक्षण तर त्यापुढे चालू होते. परंतु एक लक्षात घेणे जरूरी सज्ञान अर्जदार क्र.२ यांनी शैक्षणीक खर्चाचा सविस्तर तपशील देत तश्या रक्कमेची मागणी केलेली नाही. अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार क्र.२ ही पदवीधर आहे. निश्चीतच शैक्षणीक पात्रतेचा आधार घेत आता काहीतरी अर्थाजन करण्याची त्यांची पात्रता झाली आहे. बी.कॉम.झाले आता एम.कॉम. करायचे, पदवीधर झाले आता एल.एल.बी.करायचे,एल.एल.बी झाले आता एल.एल.एम करायचे, एल.एल.एम. झाले आता पी.एच.डी. करायचे, एम.बी.बी.एस. झाले आता एम.डी. करायचे, एम.डी झाले आता एम.एस.करायचे अश्या प्रकारे शिक्षण तर कधीच संपणारे नाही त्यामुळे त्याकरीता मला पैसे द्या असे देखील पाल्य म्हणू शकणार नाही. चरितार्थ भागवण्या करीता काहीतरी बेसीक शिक्षण झाले आहे हे पहाणे जरूरी.

**(१०)** मुळात वर नमुद केल्याप्रमाणे सज्ञान झाल्यामुळे ''चाईल्ड'' या व्याख्येमध्ये अर्जदार क्र.२ बसत नाही. त्या अद्याप अविवाहीत असल्यामुळे निश्चीतच त्यांना वडीलांकडून खावटी मागण्याचा अधिकार आहे तथापि, कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तो अनुतोष त्यांना

देता येणार नाही. त्यांनी द हिंदु ॲडॉप्शन ॲन्ड मेन्टेनन्स ॲक्ट १९५६ मधील कलम २० प्रमाणे प्रकरण दाखल केल्यास मागणी केल्याप्रमाणे अनुतोष मिळू शकेल. करीता सज्ञान अर्जदार क्र.२ यांना मागणी केलेली अंतरिम पोटगीची रक्कम देण्यास हे न्यायालय (इच्छा असून देखील) तयार नाही.

**(११)** उत्तरवादी हे शिक्षक म्हणुन हुतात्मा बाबू गेणू विद्या मंदीर, इचलकरंजी येथे कार्यरत. अर्जदारा सोबतच्या नातेसंबंधाबाबत ते कोणताही वाद करत नाहीत. त्यांचा मुळ पगार रु.९०,२९६/— इतका असल्याचे दिसून येते. ही बाब देखील दुर्लक्षित करता येणार नाही की, अर्जदार क्र.१ या मौ.रांगोळी येथे राधिका कलेक्शन या नावाने लेडीज वेअरचे दुकान चालवतात व **त्यांच्या कथनानुसार** त्यांनी स्वकष्टातुन मौजे रांगोळी येथील गट क्र.६०२/अ क्षेत्र २०आर ही मिळकत दि.१५.०५.१९ रोजी लक्ष्मीबाई शंकर येवाळे यांच्याकडून रु.५,६०,०००/— विकत घेतली. या व्यतिरिक्त त्यांनी मौ.रांगोळी येथील गट क्र.२१३ मधील एक गुंठा क्षेत्र घर बांधण्याकरीता नऊ लाख रुपयांमध्ये विकत घेण्याचा करार केला. (सदर मिळकती या उत्तरवादी यांनी त्यांच्या उत्पन्नातुन अर्जदाराच्या नावे विकत घेतल्याचे कथन केले आहे.) अर्जदार क्र.१ यांनी एका सह.बॅकेस त्यांच्या नावे असलेली मिळकत तारण देत एकोणीस लाख रुपये इतके कर्ज काढून घराचे बांधकाम चालू केल्याचे दिसून येत आहे. उत्तरवादी यांनी अर्जदार क्र.१ यांच्या विरुध्द दि.मुकादमा क्र.२५२/२२ दाखल करत वाद मिळकतीचा ते मालक आहेत असे हक्कज्ञापन होवून मिळण्याची विनंती केली आहे.

**(१२)** मुळात कोणतेही सबळ कारण नसताना उत्तरवादी यांनी अर्जदारांचा त्याग केला आहे, त्यांच्यावर कौटुंबीक हिंसाचार केला, त्यामुळे अर्जदार क्र.१ व्यथित स्त्री आहे असा अर्जदाराच्या वतीने युक्तिवाद केला. तर लेखी युक्तिवाद नि.क्र.२६ दाखल करत उत्तरवादी यांचे कथन की, कोणतेही सबळ कारण नसताना अर्जदार यांनीच त्यांचा त्याग केला, विभक्त राहू लागले. शारिरीक व मानसिक छळ केल्याची बाब उत्तरवादी यांनी नाकारली.

**(१३)** मुळत: उत्तरवादी क्र.१ हा अर्जदारासोबत राहत नाही. कोणतेही भारतीय स्त्री कोणताही त्रास नसताना पतीचे घर सोडून स्वत:च्या मर्जीने विभक्त राहणार नाही. कौ. हिं.म.रक्षण करणारा अधिनियमाचे कलम १७ अन्वये पत्नीच्या अधिकाराची तरतुद करण्यात आली आहे. पत्नीला फक्त सांभाळणे एवढाच अधिकार तीला नसुन तीला

राहण्याचा अधिकार सुध्दा या अधि नियमान्वये देण्यात आलेला आहे. राहण्याचा हक्क हा ज्या मालमत्तेमध्ये पतीचा हिस्सा असेल त्या मालमत्तमध्ये रहाण्याचा सर्वात जादा अधिकार देण्यात आलेला आहे.

**(१४)** उत्तरवादी यांनीच अर्जदारांचा त्याग केला की अर्जदार स्वत:हून विभक्त राहत आहेत यासह तत्सम बाबींवर योग्य वेळी उहापोह केला जाईल. अर्जदार क्र.१ यांच्या नावे असलेली स्थावर मिळकत त्यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे की, उत्तरवादी यांच्या उत्पन्नाचा वापर करत अर्जदार क्र.१ यांच्या नावे ती खरेदी केली आहे याबाबी पुराव्याअंति ठरणार आहेत. संचिकेवर अशी कोणतीही बाब नाही की ज्यायोगे असे म्हणता येईल की, उत्तरवादी क्र.१ याने त्याची पत्नी व मुलींकरीता काही रक्कम दिली आहे अथवा इतर काही व्यवस्था केली आहे. अर्जदार हया लेडीज वेअरचे दुकान चालवतात केवळ त्या एका बाबीवरुन मागणी केलेला अनुतोष मिळण्यास त्या अपात्र ठरणार नाहीत. कारण पती पासुन विभक्त राहणा—या महिलेला स्वत:च्या व मुलीच्या चारित्रातार्था करीता काही ना काही तरी काम धंदा करावा लागणारच आहे. <u>बादशाह वि.उर्मिला एस.एम.पी.क्र.८५९६/१३</u> फौ.अर्ज क्र.१९५३० /१३ या प्रकरणामध्ये ठरविलेले मार्गदर्शक तत्व आपणास लक्षात घेता येईल. त्या प्रकरणामध्ये पत्नी अंगणवाडी सेविका म्हणुन काम करत होती, त्यामुळे ती अन्न वस्त्राची रक्कम मिळण्यास अपात्र असे कथन होते. ना.सर्वोच्च न्यायालयाने असे ठरविले की, चरितार्थ भागविण्याकरीता एखादे छोटे मोठे काम केले त्या एका बाबी वरुन पत्नी अन्नवस्त्राची रक्कम मिळण्यास अपात्र ठरणार नाही.

**(१५)** उत्तरवादी हे नोकरीस आहेत. जवळपास त्यांना एक लाख रुपये इतके मासिक वेतन आहे. अशी देखील कोणतीही बाब संचिकेवर नाही की ज्यायोगे असे म्हणता येईल की उत्तरवादी याने एकाच वेळी मोठी रक्कम अर्जदाराला दिली आहे किंवा पैश्याचे स्त्रोत असलेली एखादी मिळकत तिला दिली आहे आणि त्या रकमेचा विनीयोग करून अर्जदार स्वत:चा उदरनिर्वाह करू शकते. त्याबाबत जी काही कथने आहेत ती अद्याप शाबीत व्हायची आहेत. <u>सुधा पाटील वि.राजकुमार रवी पाटील १९९७ (२)एम.एल.जे.२५०</u> या प्रकरणामध्ये तर अंध पतिस देखील पत्नीला पोटगीची रक्कम देण्यास आदेशीत केले होते. <u>संदिप वि.सुमन</u> या प्रकरणामध्ये ना.पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने असे ठरविले आहे की, Even a professional beggar has

a moral and legal liability to maintain his wife, who is unable to maintain herself. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार क्र.१ यांनी पुर्नविवाह केला असे उत्तरवादी यांचे कथन नाही. उलटपक्षी ती उत्तरवादी यांनी जन्म दिलेल्या अर्जदार क्र.२ हिचा सांभाळ व शिक्षण करत आहे असे स्पष्ठ दिसून येत आहे. या प्रकरणात तर उत्तरवादी चांगल्या वेतनाच्या नोकरीस आहे. निश्चीतच कष्ट करण्याची धमक असलेले त्याचे वय आहे. गजेंद्र सिंग यादव वि.श्रीमती बिंदु यादव, मणु/आर.एच/३११/२०१३ राजस्थान या प्रकरणामध्ये ठरविल्या प्रमाणे पत्नीचा सांभळ करणे ही पतीची जबाबदारी आहे. उत्तरवादी हे त्यांना खावटी देण्यास सक्षम असल्याचे दिसून येत आहे. उत्तरवादी याचे असे म्हणने नाही की, अर्जदार व तो उभयतांच्या संमतीने विभक्त राहत आहेत किंवा अर्जदार क्र.१ व्याभीचारी जीवन जगत आहे.

**(१६)** अर्जदार क्र.२ ही जरी सज्ञान असली तरी ती अद्याप अविवाहीत आहे. पुढील शिक्षणा करीता निश्चित तिला पैश्याची आवश्यकता आहे. तो खर्च भागविणे बाप या नात्याने उत्तरवादी यांचे कर्तव्य आहे परंतु सद्यपरिस्थीतीमध्ये आई/अर्जदार क.१ ही तो खर्च कष्ट करून भागवत आहे. आपण जन्म दिलेली मुलगी एकदा अठरा वर्षाच्या पुढे गेली म्हणजे बापाचे कर्तव्य संपले असे म्हणता येणार नाही. प्रकरणामध्ये खरा न्याय होणे जरुरी. निश्चितच उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या नावे असलेली मिळकत गहाण ठेवत कर्ज काढले आहे, घराचे बांधकाम चालू केले आहे, त्या महिलांचे कपडे विक्रीचे छोटेसे दुकान चालवतात तथापि, त्या एका बाबीचा आधार घेत त्या आता स्वत:चा चरितार्थ चालविण्यास सक्षम आहेत असे म्हणत मागणी केलेला अनुतोष मिळण्यापासुन त्यांना अपात्र ठरविता येणार नाही. मुळात अंतरिम पोटगी मंजुर करण्याचा उद्येश हा टु प्रिव्हेंट द डेस्टीटयुशन व व्हॅग्रन्सी असा आहे. जवळपास एक लाख रु.मासिक वेतन घेणा—या शिक्षक पतीच्या स्टेटसप्रमाणे जीवन जगण्याचा समान हक्क व अधिकार पत्नी व मुलगी या नात्याने अर्जदारांचा आहे. त्याच वेळी हे ना ओरीसा उच्च, खंडपिठ कटक या न्यायालयाने **सययद फकीरुद्यीन विरूध्द हिना बेगम, रिव्हीजन अर्ज क्र.७०/१६** या प्रकरणामध्ये दि. ०४/०१/१७ रोजी असे ठरविले आहे की mechanical way of fixation of maintenance at the whim and pleasure of the Court is not permissible. The decision should not be arbitrary but judicious.....DV maintenance is not for wife's luxury, should be judicious, not arbitary.

**(१७)** **<u>फौ.रिव्हीजन अर्ज क्र.७४/१५</u>** यामध्ये ना.उच्च न्यायालय मुंबई नागपुर खंडपीठ यांनी २०.१२.१५ रोजी असे ठरविले आहे की, दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे याबाबत न्यायालय स्वत:हून दखल घेवू शकते. अर्जदार क्र.२ ही एम.बी.ए.चे शिक्षण घेणार आहे व त्याकीरता तिला शालेय फि करीता पैश्याची आवश्यकता आहे असे स्पष्ट दिसून येत आहे. **<u>रजनीश वि.नेहा</u>** या न्याय निर्णयामध्ये ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची पुर्तता म्हणुन उभय पक्षकारांच्या वतीने उत्पन्न व दायित्वाची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. दस्तांचे वादतथ्य, संबध्दता, दस्तऐवज शाबीती, त्याच्या खरेपणाबाबतची गृहितके, शाबितीची जबाबदारी, स्वीकार्य पुरावा, व त्याच्या सत्यवादीत्वाबाबत निर्णय या स्टेजला नोंदविता येणार नाही. त्या बाबतचा योग्यवेळी उहापोह केला जाईल.

**(१८)** प्रकरणाची परिस्थिती पाहता, नातेसंबंध पाहता मुलीच्या शिक्षणाकरीता अर्जदार क्र.१ यांना पैश्याची निकड याचा विचार करता तसेच उत्तरवादी यांच्याकडे उत्पन्नाचे पुरेसे साधन असल्यामुळे त्यांची आर्थिक निकड लक्षात घेता, सर्व कायदेशीर मुद्दे खुले ठेवत, या स्टेजला अर्जदार क्र.१ यांना अंतरिम पोटगी मंजुर करणे न्यायोचित वाटते.

**(१९)** काही मार्गदर्शकतत्वे खावटीची रक्कम ठरवताना लक्षात घेतली. इतकेच नव्हे तर अर्जदार क्र.१ व उत्तरवादी यांचे वय लक्षात घेता, सध्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी लागणार खर्च, उत्तरवादी याचे उत्पन्न, त्याच्यावर अवलंबुन असलेले त्याची आई, मुलीच्या शिक्षणाकरीताचा खर्च, मुलगा अमेय सर्व बाबी विचारात घेता, अंतरिम रक्कम मंजुर करणे न्यायाचे होईल. खावटीची रक्कम ठरवताना मी <u>रिधिमा जुनेजा वि.देवेन जुनेजा २०१२(ix) अे.डी.दिल्ली, ६१३</u> या प्रकरणातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेतली. सर्व विवेचनावरुन हे सिध्द होते की, उत्तरवादी याच्याकडे अर्जदारा क्र.१ यांना स्वतंत्र अन्नवस्त्राची रक्कम देण्यास पुरेशे साधन आहे व तो सक्षम आहे. जरी कायद्यानुसार सज्ञान मुलगी म्हणून अर्जदार क्र.२ यांना अनुतोष देता येत नसला तरी त्यांच्या शिक्षणाकरीता होणार खर्च लक्षात घेता, जीतकी रक्कम सर्व साधारणपणे या न्यायालयाने अर्जदार क्र.१ यांना मंजुर केली असती त्यापेक्षा थोडी जास्त रक्कम मंजुर करत प्रकरणामध्ये खरा न्याय करण्याचा प्रयत्न केला आहे करीता खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

**१.** अर्ज अंशत: मंजूर केला.

**२.** उत्तरवादी क्र.१ उमेश हरीबा भुयेकर यांस आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि.२३.०८.२०२२ पासुन अर्जदार क्र.१ यांना प्रतिमहा रक्कम रू.२०,०००/— प्रमाणे अंतरिम खावटीची रक्कम द्यावी.

**३.** या व्यतिरिक्त सदर अर्जाचा खर्च म्हणुन उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदारांस रक्कम रु.५०००/— द्यावी.

**४.** कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम, २००५ कलम २४ प्रमाणे आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

**५.** सर्व कायदेशीर मुद्दे खुले ठेवले.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये अधिघोषित करण्यात आला.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2023.06.06 16:06:50 +0530

( गणेश अंबादास घुले )
न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी.
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.
न्यायालय क्र.३
जे.ओ.कोड : २५९४.

दिनांक : ०२/०६/२०२३.